पक्षीवेड

बालपणी पक्षांची ओळख, काऊ चीऊच्या गोष्टी पासून सुरू होत होत पालकांचा उत्साह जर दांडगा असेल तर मैना खबूतरा पर्यंत येऊन थांबते . शाळा सुरू झाल्यानंतर डी फॉर डॉंकी च्या ऐवजी कुठल्या एखाद्या पुस्तकात डी फॉर डक या पलीकडे पक्षी क्वचितच जवळ बसतात. सर्व सामान्यात पक्षांचा शब्दकोश फार मोठा नसतो. उडणारे मोठे पक्षी म्हणजे घार, कावळे. पिंज-यात दिसणारा पोपट, कधीकाळी खेड्यात गेलो तर कोंबडा कोंबडी बाकी सर्व चिमण्या. या सर्व चिमण्यांत काही लाल चिमण्या, काही पिवळ्या चिमण्या काही काळ्या चिमण्या. जणू काही हे सगळे पक्षीविश्व ह्या काही छोट्या मोठ्या चिमण्यावजा पक्ष्यातच समावलेलं आहे. सहाव्या इयत्तेत जेव्हा लार्क वर कविता वाचायचो आणि तसेच गाणसम्राज्ञी लताला नाईटींगेल म्हटल्याचे समजले तेव्हा या सगळ्याची रूपं चिमण्या कावळ्यातच बघत असू. काही पक्षी हे फक्त गोड गळ्याचेच असतात हा भ्रम प्राणिसंग्रहालयात मोराचा सुंदर पिसारा बघितल्यावर दूर झाला व पक्षांत सौंदर्य सुद्धा असतं हे कळलं !




मुंबईत न बघीतलेल्या पक्ष्यांची दर्शने ही प्राणीसंग्रहालयातीत वेगवेगळ्या ठिकाणी डांबून ठेवलेल्या पिंज-यापर्यन्तच मर्यादित होते अर्थात त्यामध्ये काही विदेशी पक्ष्यांचाही समावेश असायचा. मित्राच्या गप्पागोष्टीत जेव्हा पक्ष्यांच्या जाती, रंग, व आवाजांची वर्णन कानावरून जायची तेव्हा त्यांच्या इतक्या विविधतेवर विश्वासच बसत नसायचा ! त्या पक्षी पंडितासमोर आमची अवस्था एखाद्या बालकमंदिरातील पोरासारखी व्हायची . परंतु त्या सोबतच बाल सदृश्य जिज्ञासा पण जोर मारायची. एकदा त्यांच्या बरोबर रायगड जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्यात जायचे ठरविले. तेथल्या दाट जंगलात एक छान विश्रामगृह आहे आणि समोरच्या डोंगरावर महादेवाच्या पिडींत जसे लिंग दिसते तसा एक उंचच उंच काळा दगडी सुळका आकाशाला भिडत गेलेला दिसतो. ते दृश्य फारच विलोभनीय होते. जेव्हा कळते की आपले स्वातंत्र्य वीर वासुदेव बळवंत फडके ह्यांचे इंग्रजाच्या तगाद्याला कंटाळून केलेले ते आश्रयस्थान होते ,तेव्हा शरीरात एक शिरशिरी उठून गेली. पक्षी निरीक्षणाला निघाल्यानंतर आमचे मित्रमंडळी कधी झाडावर तर कधी झुडपात जेव्हा बघायची तेव्हा आम्हाला जरा आश्चर्यच वाटयचे. मी त्यांना नवख्यासारखी व सहज विचारणा केली की, ‘‘इथे पक्ष्यांचे पिंजरे कुठे दिसत नाहीत.’?

‘तेव्हा त्यांनी सांगीतले की ‘‘अहो आपल्याला पक्षांना शोधावं लागतं. हे काही प्राणिसंग्रहालय नाही आणि या शोधण्यातच खरी गंमत असते राव ‘! ’ त्यांचे हसण्यावारी बोलणे ऐकल्यावर थोडा खजील झालो. तेव्हा कळले की इथे पक्षी स्वच्छंद विहार करीत असतात. प्राणिसंग्रहालयातील मर्यादींत निश्चितता आणि त्याउलट रानाचे सुंदर रूप व पक्षी शोधाची अमर्याद अनिश्चितता या मधला फरक समजला व पक्षी निरीक्षणाचे गम्य कळले.






प्राणी संग्रहालयातील चाकोरीतील आनंदापेक्षा या वनातील पक्षी दर्शनातील अनिश्चिततेत गुरफटलेला निर्भेळ आनंद काही औरच असतो. पक्षी हे मुळातच घाबरट असल्याने आपल्यापासून नेहमी बरचं अंतर ठेवतात, त्यामुळे साध्या डोळ्यानी त्यांच्या रंगा आकाराच्या निरिक्षणात बऱ्याच मर्यादा येतात हे कळले. तेव्हा स्वतःचे बायनोक्युलर (दुर्बिणी) असल्याशिवाय पक्षी निरिक्षणाचा इतका आनंद आपण घेऊ शकत नाही याची प्रकर्षाने जाणीव झाली. परंतु ती उणीव आम्हाला या छंदाच्या आहारी जायला परावृत्त करू शकली नाही. सत्तरच्या काळात भारतात पक्षी निरीक्षणासाठी लागणाऱ्या दुर्बिणी दुर्मिळच. त्यामुळे एका मित्राकरवी बाहेर देशातून एक चांगली दुर्बीण मिळवण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. आमच्या मुंबईतील तीसऱ्या माळ्यावरील गॅलरी समोर एक जूनं वाकलेले गुलमोहराचे झाड होते. एक दिवस सकाळी एका लयबद्ध टकटकने आमचे लक्ष वेधून घेतले, बघतो तर काय अगदी दहा फूटावर एक चिमणी पेक्षा किंचित मोठा पूर्ण हिरव्या रंगाचा चोचीवर सुंदरसे लाल पीस असलेल्या पण शेपूट नसलेला पक्षी. त्याला मी आता रोज बघायचो. तो नेहमी तेथे यायचा व त्या झाडाच्या वाकड्या खोडात बीळ करायचा. इतका सुंदर व आगळा वेगळा पक्षी मी प्रथमच पहात होतो. त्याचे नांव जाणून घ्यावसे वाटले व पक्ष्याच्या माहितीचे एखादे पुस्तक घ्यायचे ठरविले. लिबर्टी थिएटर जवळील पुस्तकाच्या दुकानात पुस्तक विकत घ्यायला गेलो. प्रस्तावना ऐकल्यावर त्यांनी मला एक पुस्तक दाखवले. मी क्षणाचाही विलंब न लावता त्या पक्ष्याला त्यात शोधायला सुरवात केली आणि घ्या ! त्या सुंदर पक्ष्याचे चित्र मला त्यात दिसले. त्याचे नांव ‘बार्बेट’(तांबट) आहे हे कळल्यावर छान वाटले. हा माझ्या पक्षिनिरीक्षणाचा श्रीगणेशा. त्या पुस्तकाचे नांव होते ’दि बर्डस् ऑफ इंडिया ऍन्ड पाकीस्थान ’. त्यात डोळ्यावर चष्मा व गळ्यात दुर्बीण, डोक्यावर कॅप घातलेल्या एका दाढीवाल्या व्यक्तीचा फोटो दिसला व सोबत लेखकाचे नांव लिहले होते सलीम अली.
दुकानदार चतूर होता, त्याने माझ्या हालचाली वरूनच ओळखले की, हा नया पंछी आहे. हे पुस्तक भारतीय पक्ष्यांचे बायबल आहे आणि ह्या पुस्तकाचे थोर लेखक मुंबईतच राहतात ही पूस्ती जोडली. मुंबईत राहतात हे कळल्यावर मला पक्ष्याइतकीच त्या प्रभावी व्यक्तीला भेटायची

इच्छा झाली. नंतरचा योगायोग म्हणजे बांद्रा पश्चिमेला पाली मार्केटहून पाली हिलच्या टेकड्यावर जो वळणाचा रस्ता जातो त्या रस्त्यावर ही गोष्ट घडली. सायंकाळचे पाच वाजले असतील प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर रहेजाच्या बिल्डिंग जवळ पोहचत नाही तोच समोरून पायात स्पोर्टशूज, खाकी हॉफपॅन्ट त्यात तत्सम खोचलेला शर्ट, गळ्यात दुर्बीण, खांद्यांवर बॅग, पांढरी दाढी व मिश्या, डोळ्यावर चष्मा आणि डोक्यावर स्पोर्टस कॅप घालून एक व्यक्ती जातांना दिसली. किरकोळ बांद्याची पाच-सव्वा पाच फूट उंचीची मूर्ती बघून मी जागच्या जागीच खिळलो. पुस्तकातील फोटोशी मिळणारे व्यक्तिमत्व बघून मी ताबडतोब ओळखले हे तर आपल्या पुस्तकातील सलीम अली. त्यांना लवून नमस्कार केला, त्यांनी हॅलो म्हटले आणि त्यांच्या बद्दलचे आदराचे दोन-तीन शब्द बोलल्यावर ते हासले आणि आम्ही आपल्या मार्गाला लागलो. पंढरीच्या वारक-याला विठोबा दिसला. एवढ्या मोठ्या व्यक्तीचे अकस्मात दर्शन झाले व्हावे. मनातून आनंदाच्या उफळ्या फुटत होत्या. त्यांचे साधेपण आणि स्वभावातील विनम्रता माझ मन जिंकून गेली आणि माझी दुर्बीण मिळवण्याची तळमळ अजूनच वाढीला लागली. पक्ष्याचे खरे सौंदर्य आणि सूक्ष्म निरीक्षण हे दुर्बिणीनेच होऊ शकते या बद्दल दुमत नाही. सुदैवाने जेव्हा माझ्या मित्राच्या एका मर्चेन्ट नेवीतील मित्राने एक पेंटास कंपनीची अप्रतीम दुर्बीण दिली तेव्हा माझा आनंद गगनात मावेना. हा आमच्या पक्षी निरीक्षणाचा छंदाचा तोरणा.

अमरावतीला आल्यावर एकाटाच दुर्बीण घेऊन जंगलात फिरत असायचो, जरी अमरावतीत पूर्ण बालपण गेलं असलं तरी ह्या चकव्या द्विजगणांच्या वास्तव्याची ठिकाणे माहीत नसल्याने नेहमी निराशा होत असायची व माझ्या पक्षीनिरीक्षणात योग्य व माहितगार साथ्याची उणीव भासायला लागली. दिवस निघून जात होते परंतु योग्य अश्या पक्षीवेड्या मित्रांसाठी कलेली प्रतीक्षा वाया गेली नाही. आधी निशी (प्रा.निशीकांत काळे) आला. या निर्भय व अतिउत्साही मित्रांबरोबर पोहरा जंगल व त्यातले सगळे तलाव पिंजून काढले. खूप नवीन नवीन पक्षी व त्यांची ठिकाणे रोजनिषीत जमा होत होती. नंतर किशोर (प्रा.किशोर रिठे) आला आणि आम्ही निसर्ग संरक्षण संस्थेचा एक छोटासा भाग झालो. कॉलेजच्या जबाबदा-या वाढत होत्या तरी कुठेही असलेले पक्षिमित्र संमेलन सोडवत नव्हते. आणि अश्याच एका संमेलनात कुबेराचा खजिना पण कमी पडेल असा मित्र समूह मिळाला. तो खजिना म्हणजे पद्माकर लाड, मनोहर खोडे (डॉ.) आणि कुमार (शिरीषकुमार पाटील) असा पक्षीवेड्या मित्रांचा त्रय. या मित्रांची वय व व्यवसाय जरी वेगवेगळे असले तरी छंद मात्र एकच. वन व पक्षी प्राण्यावरील अतीव प्रेम, निसर्ग निरीक्षणात लागणारा उत्साह व जिद्द व त्याच्या जोडीला असलेली प्रखर जिज्ञासा ह्या सर्व गुणांचा संगम. आम्हा चौखट्याचे लवकरच पांडव व्हायला ज्ञानेश्वर दमाहे नामे एक आगळे वेगळे भीमकाय व्यक्तिमत्व येवून मिळाले. त्यानंतर आम्ही पाच जणांनी वडाळी, मेळघाट, सालबर्डी, वर्धानदीचे पात्र, महेंद्री, छत्तीसगढ मधील बस्तर, नवेगांव, नागझिरा, पेंच, भीमाशंकरचे जंगल, रेहकुरी अभयारण्य वगैरे पायाखालून घातल्या व निसर्गाचा एक भाग झालो.

 

आमच्या या वेडापायी अनेक टीका ऐकल्या व ऐकतो. जश्या ‘यात काय मिळते?, या उन्हातानातून फिरतांना कंटाळा येत नाही काय? नेहमीच काही नवीन दिसते काय, हा वेळेचा व पैशाचा अपव्यय कश्यासाठी? वगैरे वगैरे. आणि त्यात कळस म्हणजे जंगलातील पशुप्राण्यांनी तुम्हाला खाल्ले तर? मित्रांनो हसू नका. आई, ताई व घरच्या मालकिणी पासून दोस्त मंडळी, एवढेही नचपुरे तर रस्यावर भेटलेला एखादा पादचारी वेड्यांकडे बघावा तसा दृष्टिक्षेप आमच्यावर टाकायला मागेपुढे पाहत नाही. जीवनाकडे केवळ भौतीकवादाचा चष्म्यातून बघणारे आम्ही या चिन्मयानंदाला खरच पारखे तर होत नाही ना? संगीत,चित्रकला, वाचन, खेळ वगैरे यातून काय मिळत? खरच कश्यात काय मिळत? याच साध उत्तर म्हणजे एक निर्भेळ आनंद, एक जुनून, आणि त्याचे वर्णन शब्दांकणापलीकडले आहे. भौतीक आनंदापासून खुप दूर. ते केवळ अनुभवायचे व निर्भेळपणे वाटायचे. .

या छंदापायी नवीन नवीन पक्षी बघितले, नवीन पक्ष्यांच्या शोधात अनेकदा खुपखुप भटकलो.त्यातील काही अविस्मरणीय घटना खालील प्रकरणात देत आहोत.

## काळा करकोचा (ब्लॅक स्टॉर्क)

अमरावतीच्या परिसरात अनेक तळ्यावर पांढरी मान व काळे अंग असा पारध्यागत शांत उभा असलेला पक्षी तुम्ही कधी बघितला असेल, हे बरेचदा एकटे किंवा जोडीने तळ्याच्या काठावर शांत बसलेले असतात. तो पक्षी म्हणजे पांढ-या मानेचा करकोचा. क्वचित पिवळी चोच, पिवळे पाय असलेला, पांढ-या रंगाचा व पंखावर तांबड्या व काळा व निळा रंगाचा छिडकावा असलेला असा रंगीत करकोचा बघाल. हा आपल्याकडे हिवाळी पाहुणा म्हणून येतो. हे पक्षी ४-५ च्या थव्याने राहतात. चिखलातील भक्ष्ये शोधतात व हिवाळाभर आपल्या भागातील तलावावर वास्तव्य करतात व उन्हाळ्याची चाहूल लागताच मायदेशी निघून जातात. परत आल्यावर आपल्या जुन्या ठिकाणीच नेमके मुक्काम करतात. डॉ. मनोहर खोडे दरवर्षी नियमितपणे ह्या पक्ष्याचे निरीक्षण करतो. त्यांना आढळलेली माहिती फार रंजक आहे. वरुड जवळील सातनूर तलावावर या पक्ष्यांचा एक थवा दरवर्षी दिसतो. त्यांत एका पायाने लंगडा असलेला करकोचा हमखास दिसत व त्यावरून त्याने निदान काढले की काही पक्ष्याचा थवा एखाद्या विशिष्ट तलावावरच दरवर्षी वास्तव्य करतो हे निष्चीत झाले.

वरूड गावाच्या उत्तरेला महेंद्रीच्या जंगल आहे. त्यातील पंढरी तळे हे डोंगराच्या राईत मनुष्य वस्ती पासून वेगळे, डोंगर कपाळीत दूर पर्यत लांबच लांब पसरलेले आहे. अश्या या विशिष्ट रचनेमुळे वेगवेगळ्या पक्ष्यांना चांगली लपण मिळते.



डिसेंबर-जानेवारीत जेव्हा तलावाचं पाणी ओलितासाठी सोडल्या जाते तेव्हा तळ्याच्या काठाने साचलेला चिखल उघडा पडतो आणि चिखलातले किडे खाना-या अनेक पाणपक्ष्यांचे ते एक आवडीचे ठिकाण बनते. चक्रवाक, पिनटेल, सेंडबायपर, प्लावर, काळ्या डोक्याचा स्टिल्ट, ग्रे हेरॉन असे अनेक रंग रुपाच्या व आकारांच्या पक्ष्यांनी तो तलाव गजबजून जातो. पाण्यांत पोहनारे नकटा, धनवर, पणडुब्बी, पाणकावळा, रेड क्रेस्टेड पोचार्ड इत्यादी पक्षी तलावाची शोभा वाढवतात. त्यात काठावर व्हाईट नेक्ट्ड स्टॉर्क हा नेहमीचाच पाहुणा. इतक्या विविध पक्ष्यांचे आश्रयस्थान असलेल्या ह्या तळ्याने आम्हां पक्षी वेड्यांना आकर्षित न केले तर नवलच. अमरावती जिल्ह्यातील वाढत्या तलावाच्या संख्येने म्हणा की आमच्या वाढलेल्या भेटीमुळे म्हणा दर वर्षी येथे आम्हांला काही तरी वेगळे बघायला मिळतं.

१९९७ च्या पंढरी भेटीत जेव्हा आम्ही बांघावर पोहोचलो तेव्हा पंढरीचा काठ काही वेगळ्या पाहुण्यांनी भरलेला होता. एक काळ्या रंगाचा तीन एक फूट उंचीचा करकोचाच्याच जातीच्या पक्ष्याचा थवा आम्हांला दिसला, तो मोजला असता त्यात सतरा पक्षी होते. दुर्बिणीतून निरीक्षण केल्यावर सुंदर लालपाय, पूर्ण काळे शरीर पण पोट मात्र पांढर स्वच्छ, लांब जाडसर लाल रंगाची चोच असलोला एक रूबाबदार व देखणा पक्षी बघून आम्ही अचंब्यातच पडलो. भराभर पुस्तके बाहेर निघाली व या पक्ष्याची जात शोधायला सुरुवात केली, एकंदरीत माहिती वरून वा चित्रा वरून ते पक्षी ब्लॅकस्टॉर्क आहे हे कळले. आम्हाला आशर्याचा सुखद धक्का बसला. जेव्हा 'पॉकेट गाईड टू बर्डस् ऑफ इंडियन सबकॉन्टीनेन्ट बाय रिचर्ड ग्रिमेट' हे पुस्तक बघितले तेव्हा अजूनच विस्मीत झालो. त्यावरून कळले की या पक्ष्याच्या नोंदी अमरावतीतच काय पण विदर्भात सुद्धा आतापर्यत झालेली नाही. आमचा आनंद गगनात मावेना कारण ही नोंद म्हणजे एक नवीन शोध होता. या नवीन शोधाला इंडियन एक्स्प्रेस या दैनिकाने योग्य प्रसिद्धी दिली व आमचा उत्साह अजून वाढला. त्यानंतर मात्र हा पक्षी हळुहळू अमरावती सभोवतालच्या तलावात दर वर्षी दिसायला लागला. मुख्यत्वे करून इंदला व शेवती तलावावर.

 


अमरावती जिल्यात सर्व अधिक शेती मुख्यतेकरून कोरडवाहू. वर्धा व पूर्णा ह्या बारमाही नद्या सोडल्या तर इतर नद्या केवळ पावसाळी. पूर्वी दाभेरीचा नैसर्गिक तलाव व अमरावतीच्या आजुकाजूचे काही बांधलेले तलाव सोडले तर पाणवठ्याचा एकंदरीत दुष्काळच. त्यामुळे येथे हिवाळी स्थलांतरित पक्ष्याच्या नोंदी कमीच आढळल्या असतील. परंतु स्वातंत्र्यानंतर अनेक लघुसिंचन प्रकल्प यायला सुरुवात झाली व हळुहळू अमरावतीच्या जिल्हा छोट्या छोट्या धरणाच्या पाणसाठयाने भरून गेला. पाणी हे जीवन. या जीवनदायी जलातूनच छोट्या ते मोठ्या कीटक प्राण्यांची व मासे यांची शृंखला सुरू होते हे ज्ञात आहेच. या नवीन जलाशयांतील विपुल नैसर्गिक खाद्य निर्मितीमुळे हळुहळू उत्तरेकडील सातपुडा पर्वत ओलांडून स्थलांतरित पक्षी आपल्या दक्षिणेकडील भागाकडे आकर्षित व्हायला लागले असावेत. कालांतराने त्यांच्या संख्येत वाढ व्हायला लागली असावी. ज्या पाणसंचयामुळे निसर्गातील एवढ्या मोठ्या खाद्य शृंखलेचा उदय होतो अशा या निसर्ग उपयोगी पाणसंचयासाठी उभरल्या जाणा-या धरणांना लोकं जेव्हा विरोध करतात किंवा आडकाठी टाकतात तेंव्हा हसावे की रडावे कळत नाही.

रोहीत (फ्लेमिंगो)

फ्लेमिंगो चे थवे शिवडीच्या दलदलीत जेंव्हा आम्ही मुंबईला पाहिले तेंव्हा मुंबईच्या प्रद्रुषणाबध्दल सतत हाकाटी आयीकणा-या मुंबईकरांना एक सुखद धक्का बसला असेल. हजारांच्या संखेत पाण्यांत डोके बुडवून त्यांच्या ॲल्गी (शेवाळ) खातांना लांबलचक मानेच्या मोहक हालचाली बघून तो मुंबईकर मोहीत न झाला तरच नवल. या सुंदर पक्षांची कच्छच्या रणात गाळामातींनी बनवलेल्या घरट्यांत वीण करण्याची आवडती जागा आहे. त्यांच्या सखोल अभ्यासाच्या नोंदी डॉ. सलीम अलींनी केल्या आहेत. ओरीसातील चिल्का तलावातल्या वास्तव्यानंतर हे पक्षी विणीसाठी कच्छच्या रणात स्थानांतर करतात. त्या स्थलांतराच्या वेळेस बरेचदा बुलढाणा जिल्ह्यातील जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या खा-या पाण्यातील ब्लु ॲल्गी आवडीने खायला हा पक्षी उतरल्याच्या नोंदी आहेत परंतु अमरावती परिसरात हा पक्षी एकदम नवखा.

आमचे , मडीकल रिप्रेझेन्टेटिव्ह म्हणून की बर्डवाचर म्हणून, सतत फिरतीवर असणारे मित्र श्री. राजू कसंबे यांनी दिलेल्या माहितीवरून आम्ही अमरावती चांदुर रेल्वे रस्त्यालगत दक्षिणेकडे सावंगा विठोबा या गावाजवळील तलावाला भेट द्यायचे ठरवले. विस्तीर्ण व पसरट अशा या मालखेड तलावाचा बांध पूर्व दिशेला असून पश्चिम दिशेला हे गांव वसलेले आहे.

दलदलीचा भाग नेमका पश्चिम दिशेला पसरला आहे. या विशिष्ट परिस्थितीमुळे फोटोग्राफीला उत्तम वेळ दुपारनंतरच योग्य त्यामुळे दुपारी जायचे ठरवलं.

गावाला वळसा घालून गेल्यावर जेव्हा तलावाचा काठ दिसायला लागला तेव्हा चारएक फूट उंचचे, वरकरणी पांढरे स्वच्छ दिसणारे परंतु पखांच्या कडेला लालभडक पीस असणारे फ्लेमींगो जातीचे पक्षी एका मोठ्या थव्यात दिसले. ते दृश्य पाहून आमचे भानच हरपले. इंग्रजी ड्ढ आकाराची लांबच लांब मान व त्यापुढे वरच्या बाजूला लाल व खालच्या बाजूने नांगराच्या फाळे प्रमाणे दिसणारी काळे टोक असलेली चोच, चोचेच्या वरच्या बाजूला पिवळे डोळे, पाण्यात अर्धे बुडालेले पाय असे हे ग्रेटर फ्लेमींगो.

हा तलाव बराच पसरट असल्याने काठावर चांगलीच फसण तयार होते. फोटोग्राफीसाठी आम्ही हळुहळू फसणीतून पक्षांजवळ जाण्याचा प्रयत्न केला. पक्षी आम्हांला पाहून उडून जाऊ नये म्हणून बसूनच हळुहळू सरकणे क्रमप्राप्त होते. हातात जड कॅमेरे, ट्रायपॉड आणि बायनाक्युलरस् नेतांना बरीच दमछाक होत होती. पुढे जाणे अधिकच कठीण होत गेले कारण पाय दलदलीत अधिकच रुतू लागले होते. शेवटी पुढे जाणे अशक्य झाल्याने ट्रायपॉड वर कॅमे-याची जुळवाजुळव सुरू केली. या नवीन उपलब्धीमुळे म्हणा की पक्ष्याच्या अनिश्चित हालचालीने म्हणा आमचा जीव धडधडत होता. परंतु त्यांनी आम्हांला निराश केले नाही. सहज लिलयतेने आपल्या लांबचलांब मानेने अनेक मोहक हालचाली करीत होते. त्यांचे आपसातील खोड्या, चेष्टा, मश्क-या व खेळणे अविरत सुरू होते. या इतक्या सुंदर दीसना-या पक्ष्यावरून आमची नजर हटत नव्हती होते. त्यांचे सहज पाण्याखाली जाणारे डोके व चोचींच्या विशिष्ट हालचाली विस्मयचकित करणारी होती. वरमान करून जेव्हा ते पंख फडफडवीतांत तेव्हा पंखाखालील लालभडक रंग व काळी किनार बघून याला मराठीत अग्निपंख व इंग्रजीत फ्लेमींगो का म्हणतात हे समजायला वेळ लागत नाही. निरीक्षणात वेळ कसा गेला कळलेच नाही. सूर्य केव्हाच मावळतीला लागला होता, अंधार पडायला सुरुवात झाली होती, अंधारातून चिखलातून वापस जाणे कठीण झाले असते म्हणून नाइलाजास्तव परतीचा मार्ग धरला.

हा क्वचित येणारा पाव्हणा परत कधी दिसेल का ? याची हुरहूर लागली होती त्यामुळे दुस-या दिवशी सकाळी परत यायचे ठरवले. त्यांचा सतत ओरडण्याचा हॅाँग हॅाँग असा आवाज कमी होत गेला आणि आम्ही गावाजवळ पोहोचलो या भेटीच्या अनुषंगाने अजून एक घटना सांगावीशी वाटते. सावंगीला अवधूत पंथाचे एक कृष्णाजी महाराज यांचे एक जुने समाधीवजा देऊळ आहे, मंदिराच्या बाहेर जत्रे सारखे वातावरण नेहमीच दिसेल. अनेक दुकानदार पूजेचं सामान नारळ, फुले, उदबत्त्या विकतांना दिसतील. मंदिराच्या आतून नगा-याचे व झांजेचे लयबद्ध आवाज येत होते. उत्कंठेपोटी आम्ही आंत शिरलो. एका ५० फूट लांबी-रुंदीच्या परकोटा आंत एक २० फूट लांबी-रुंदीचा' सभामंडप दिसला. मंदिराला लागूनच पन्नास-साठ फूटाचे उंचच उंच असे दोन खांब दिसले. त्यामधील अंतर चारेक फूट असावे. ते पूर्ण कापडाच्या लांबच लांब खोळीने झाकलेले होते. या उंच खांबाच्या संदर्भातील माहिती फार वेगळी आहे. जुनाट खांब कधीकाळी बदलावे लागतात तेव्हा मंदिराचे पुजारी जंगलांत फिरून योग्य अश्या सागाच्या झाडांची निवड करतात. विधीवत पुज्या पाटानंतर तोडलेले ते उंच खांब

वाजत गाजत मंदिरातील जुनाट खांबाजागी रोवतात. या उंच खांबावरील एकसंघ लाबच लांब कापडाच्या खोळी दरवर्षी समारंभात बदलतात. एक माणूस त्या दोन खांबाच्या आधारे जुन्या खोळी गुंडाळत वर जातो व खाली येतांना नवीन  खोळी घालत येतो. या ५०-६० फूट उचीच्या खांबावरील बीनाआधारे चालणारी कसरत बघायला जत्राच जमते. मंदिराच्या मागील बाजूंना गज लावलेल्या दारा पलीकडे महाराजांची समाधी व पूजास्थान आहे.  नगा-याच्या व झांजेच्या लयबद्ध आवाजात तेवढ्याच लयेने डोलतांना व घुमतांना दिसली आणि बहुतेक मंडळीची समाधी लागलेली दिसत होती. हा सगळा प्रकाराने आम्ही  विस्मयचकित झालो. नगा-या व झांजीच्या लयबद्ध व घुमणा-या आवाजामुळे हा सगळा मोहनिद्रेचा प्रकार असावा की  देवळातले वातावरण,  कळले नाही. ते सगळे दृश्य डोळ्यात साठवून आम्ही हळुहळू काढता पाय घेतला.

दुस-या दिवशी सकाळी तेथे पोहोचल्यावर फ्लेमींगो सोबतच व्हाईट आयबीस. येलोवेटेल लॅपविंग असे अनेक देखणे पक्षी तलावावर वावरतांना दिसलीत. आता सूर्य समोरून असल्याने छायाचित्रण अवघड होते.  एकाएकी फ्लेमींगोनी पाण्यावरून धावता धावता  मान जमिनीला समांतर ठेऊन एकत्र उड्डाणे भरली. लांब केलेली मान, पंखाखालील भडक लाल रंग व त्याची काळी किनार असलेला हा पांढरा शुभ्र पक्षी जेव्हा थव्यात उडतो तेव्हा  भान हरपून जाते. तलावा भोवती दोन तीन चकरा मारल्यावर तो थवा परत उतरून जुण्याजागी स्थिरावला. जूनचा महिना होता तरी पावसाला अजून सुरुवात झाली नव्हती. अजून चांगले प्रखर ऊन होतं. वीणेसाठी आक्टोबर ते मार्च पर्यंत हे पक्षी कच्छच्या रणांत राहतात.  नेहमी न दिसणारे हे पक्षी या विशिष्ट वातावरणात स्थलांतर करतांना व-हाडी आदरतिथ्य उपभोगण्यासाठी तर येते विसावले नव्हते ना ! या अग्निपंखांनो केव्हाही या आमच्या विदर्भांत, तुमचे नेहमीच मनःपूर्वक स्वागत असो.

-----------------------------------------oooooooooooooooo--------------------------------

**Writer Dr.Vijay Ingole**